# बोगस वारस दाखवून 'स्वस्तिक' चित्रपटाच्या ४ कोटींच्या जमिनीत गैरव्यवहार

## सीटी सर्व्हेच्या तत्कालीन अधिकाऱ्यांसह ८ जणांवर गुन्हा

**■ धुळे । प्रतिनिधी**

शहरातील राणा प्रताप चौकाजवळील सि.सं.नं. १४६६ मालमत्तेवर बोगस प्रतिज्ञापत्र व बनावट कागदपत्रांच्या आधारे वारस लावून तब्बल ४ कोटी रुपये किंमतीची स्वस्तिक चित्रपट गृहाची जमीन फसवणुकीने विकल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी सिटी सर्व्हेच्या तत्कालिन अधिकारी व कर्मचाऱ्यांसह ८ जणांविरुद्ध शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रेखा योगेश शाह (वय ४६ रा. प्लॉट नं. १०३, लोहिया नगर, अकोला) यांनी काल धुळे शहर पोलिसात फिर्याद दिली त्यानुसार, प्रदीप हिरालाल शाह याने २०११ मध्ये सि.सं.नं. १४६६ या मालमत्तेचा वारस नसतानाही बनावट प्रतिज्ञापत्राव्दारे सिटी सर्व्हेच्या तत्कालिन अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मदतीने सि.सं.नं. १४६६ चा उतारा तयार करीत वारस लावून घेतले. त्यानंतर मार्च २०२५ मध्ये प्रदिप शाहसह सुरेश हिरालाल शाह, उज्वला हिरालाल शाह, रजनी राजेंद्र शाह सर्व रा. स्वस्तिक हार्डवेअर, आग्रा रोड,धुळे व अभिषेक राजेंद्र शाह रा. मुंबई, मोक्षा राजेंद्र शाह उर्फ मोक्षा विराज शाह रा. नाशिक यांनी संगनमत करत सि.सं.नं. १४६६/१ ची बनावट मोजणी करून चुकीचा नकाशा तयार केला. स्वस्तिक चित्रपटगृह व त्याशेजारील क्षेत्र जे खरे तर सि.सं.नं. १४६६/४ व १४६६/५ मध्ये आहे, ते सि.सं.नं. १४६६/१ मध्ये असल्याचे दाखवत खरेदीखत तयार करण्यात आले. त्याव्दारे सि.स.नं. १४६६/१ ची विक्री करत असल्याचे दाखवून प्रत्यक्षात सि.स.नं. १४६६/४ व १४६६/५ च्या जागेची विक्री दि.३१ मार्च २०२५ रोजी दस्त क्र. १५३३/२०२५ अन्वये करण्यात आली. तर तक्रार करूनही दुय्यम निबंधक कार्यालयाने खरेदीखत नोंदवून घेत फिर्यादीची फसवणूक केली. या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेचे अमोल दिवढे करत आहेत.

# मेन स्वीच परस्पर बंद करून कामात हस्तक्षेप, एकासह इतरांवर गुन्हा

**■ धुळे । प्रतिनिधी**

शहरातील ताशा गल्ली परिसरातील श्री संताजी जगनाडे महाराज चौकात, सुंदरम प्रोव्हीजन दुकानाजवळील मुख्य रहदारीच्या ठिकाणी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या इलेक्ट्रिक लाईनजवळ काही व्यक्तींनी परवानगीशिवाय छेडछाड केल्याची घटना उघडकीस आली आहे. सौउद अबीद सरदार (रा. मच्छी बाजार, धुळे) याने इतर अनोळखी इसमांसह दि. ३० रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास वीज वितरण कंपनीच्या स्ट्रीट लाईटच्या मेनस्वीच बंद विद्युत कामात विनापरवानगी हस्तक्षेप करीत लाईट बंद केले. हीबाब परिसरातील काही नागरिकांच्या निदर्शनास येताच त्यांनी संबंधीतांना जाब विचारला. त्याचा व्हीडीओ देखील तयार केला. याबाबत विज कंपनीचे जितेंद्र पालवे यांच्या फिर्यादीवरून आझादनगर पोलिसात सौऊद सरदार याच्यासह इतरांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेकॉ शिंदे करीत आहेत.

# हरवलेल्या ६२ व्यक्तींचा शोध घेण्यात शहादा पोलिसांना यश

**■ नंदुरबार । प्रतिनिधी**

हरवलेल्या ६२ व्यक्तींचा शोध घेण्यात शहादा पोलीसांना यश आले आहे. शहादा पोलीस ठाण्याच्या मिसिंग शोध पथकाने मागील ३ महिन्यात हरविलेल्या व्यक्तींचा शोध घेतला आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. श्रवण दत्त. एस यांनी जिल्हयातील हरविलेल्या महिला, पुरुष तसेच बालके यांचा शोध घेण्यासाठी जिल्हयातील सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना वेळोवेळी सुचना केल्या आहेत. सदर मोहिम राबविण्यासाठी पथके तयार करुन जास्तीत जास्त हरविलेल्या व्यक्तीचा शोध घेणे सुरु आहे.

त्याअनुषंगाने शहादा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निलेश देसले यांनी असईप्रदिपसिंग डी. राजपूत यांच्या नेतृत्वाखाली एक मिसिंग शोध पथक तयार केले. तसेच पोलीस नियंत्रण कक्ष येथील मिसिंगचे कामकाज पाहणारे असई भगवान धात्रक यांच्या मदतीने सदर पथकाने उल्लेखनिय कामगिरी करत आतापावेतो एकुण ६२ हरविलेले व्यक्तींना शोधले आहे. त्यात ३३ महिला तर २९ पुरुषांचा समावेश आहे. सदर कामगिरी उपविभागीय पोलीस अधिकारी दत्ता पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शहादा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी निलेश देसले, असई प्रदिपसिंग राजपूत, पोकॉ कपिल मंदील, मपोकॉ शिला गावीत यांच्या पथकाने केली.

# रेल्वे अपघातात तरूणाचा मृत्यू

**■ धुळे । प्रतिनिधी**

पश्चिम रेल्वे लाईवरील दोंडाईचा -शिंदखेडा रेल्वे मार्गावर रेल्वे अपघातात तरूणाचा मृत्यू झाला आहे. जयेश सुकलाल माळी (वय २३ रा. रामी ता. शिंदखेडा) असे त्याचे नाव आहे. दि. ३० एप्रिल रोजी रात्री साडेदहा वाजता ही घटना समोर आली. तो रेल्वे पोल क्र. १९२/११ जवळ रेल्वे अपघात होवून गंभीर अवस्थेत पडलेला होता. घटनेची माहिती मिळताच त्याला काका चंद्रकांत चिंधा माळी व ग्रामस्थांनी दोंडाईचा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तेथे डॉक्टरांनी तपासणी करीत त्यांना मृत घोषित केले. याबाबत दोंडाईचा पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद झाली असून पुढील तपास पोना. राजेंद्र येंडाईत करीत आहेत.

पान १ वरुन ...

## गोदा प्रदूषणमुक्तीचे स्वप्न

कार्यकर्त्यांनीही कोर्टाची पायरी अनेकदा चढली आहे. कोणतीही नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी फक्त अभियान किंवा प्रकल्प घोषित करणे पुरेसे नाही. त्यासाठी प्रदूषणाच्या मुळाशी जाऊन काम करावे लागेल, असे मत डॉ.माधवराव गाडगीळ यांनी व्यक्त केले आहे. जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंहदेखील सातत्याने मार्गदर्शन करतात. या पार्श्वभूमीवर आगामी सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर नाशिककर 'नमामि गोदा'च्या प्रतीक्षेत आहेत. गोदावरी नदी प्रदूषणमुक्त होण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या मलनिःस्सारण केंद्रांची उभारणी, गोदाघाटांचे नूतनीकरण व सौंदर्यीकरण, कचरा व्यवस्थापनासाठी आधुनिक प्रणालींची उभारणी आणि सिंहस्थात भाविकांसाठी स्वच्छ पाणी सुविधा देणे हे त्या प्रकल्पाचे उद्देश आहेत. गोदावरीला तिचे वैभव पुन्हा मिळवून देणाऱ्या 'नमामि गोदा' प्रकल्पाची कार्यक्षमतेने अंमलबजावणी सिंहस्थापूर्वी व्हावी, हीच नाशिककरांची अपेक्षा आहे.

## पीकपाणी साधारण पण प्रलयाची भीती, मंदीचे सावट

निरीक्षण करून यंदाची भेंडवळची भविष्यवाणी जाहीर केली आहे.यंदा महत्त्वाचा मानल्या जाणारा पिक पावसाची परिस्थिती मध्ये पाऊस जून महिन्यामध्ये कमी असेल. जुलैमध्ये साधारण तर ऑगस्टमध्ये प्रचंड पाऊस असून अतिवृष्टीचे भाकीत वर्तवण्यात आले आहे. सप्टेंबर महिन्यातही पाऊस जास्त असेल. मात्र या महिन्यात अवकाळीचा फटका शेतकऱ्यांना बसणार आहे. पिका बाबत केलेल्या भाकितांमध्ये गहू, ज्वारी, तांदूळ आणि इतर पिके सर्वसाधारण मोघम स्वरूपाचे पीक सांगण्यात आली आहे. मात्र उत्पन्न चांगलं असलं तरी अवकाळीने या पिकांना फटका बसणार असल्याचे भाकीत यंदाच्या भविष्यवाणीमध्ये वर्तवण्यात आल आहे.

## दादांनी हात झटकले

स्पष्टीकरण उपमुख्यमंत्री अजित पवारांनी यावेळी दिले आहे.

**खोटं नॅरेटिव्ह पसरवण्यात विरोधक आघाडीवर**

गेल्या अनेक दिवसांपासून विरोधकांकडून देशभरात जातीनिहाय जनगणना केली जावी, अशी मागणी केली जात होती. याच मागणीबाबत आता केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. यावर बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, मजनगणनेच्या बाबतीत विरोधक दबाव आणू शकतात का? जातनिहाय जनगणना झाली पाहिजे कुठल्या घटकाची लोकसंख्या किती आहे हे समोर येईल. खोटं नॅरेटिव्ह पसरवण्यात विरोधक आघाडीवर आहेत. काँग्रेसची इतकी वर्षे सत्ता होती मग ती त्यावेळी का केलं नाही, असा सवालही अजित पवार यांनी विरोधकांना विचारला आहे.

## पहलगाम हल्ल्याबाबत सरकारचे धोरण अस्पष्ट

उपस्थित होते. सीडब्ल्यूसीच्या बैठकीत खरगे म्हणाले की, पहलगाम हल्ल्याबाबत मोदी सरकारचे धोरण स्पष्ट नाही. पण, विरोधी पक्ष या मुद्यावर सरकारच्या पाठीशी एकजुटीने उभा आहे. विरोधी पक्ष सर्वतोपरी मदत करण्यास तयार आहे. देशाच्या एकता आणि अखंडतेला बाधा पोहोचवणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आवाहनही त्यांनी केले. हल्ल्यानंतर राहुल गांधींनी कानपूरमध्ये शुभम द्विवेदी यांच्या कुटुंबाची भेट घेतल्याचे खरगेंनी सांगितले. तसेच, त्यांनी सरकारकडे मृतांना शहीद दर्जा देण्याची मागणीही केली आहे.

## वेव्हज समीटमध्ये आठ हजार कोटींचे करार

सिडकोचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलारासू, उद्योग विकास आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह आदी उपस्थित होते. सर्वोत्तम संस्थांच्या माध्यमातून सर्वोत्तम समुदाय निर्माण होतो आणि त्या समुदायांतून सर्वोत्तम राष्ट्रांची उभारणी होते. विकसित भारताच्या उभारणीसाठी आखण्यात आलेल्या नवीन शैक्षणिक धोरणामुळे भारताचे दरवाजे जगासाठी खुले झाले आहेत. नवी मुंबईत आकाराला येत असलेल्या एज्यू सिटीमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाची विद्यापीठे येतील आणि परदेशात शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वप्न आता येथेच पूर्ण होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. याशिवाय चित्रपट उद्योग क्षेत्रात झालेले करार चित्रपट निर्मिती क्षेत्राला अधिक उंचीवर नेतील, असेही त्यांनी सांगितले.

## पाकिस्तानमध्ये आर्मी चीफ अडचणीत

माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्याकडे मदत मागितली आहे. पीटीआय समर्थकांचे आंदोलन थांबवण्यासाठी आणि देशातील अशांतता कमी करण्यासाठी ही मदत मागण्यात आली आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, चार माजी लष्करी अधिकाऱ्यांनी इम्रान खान यांची भेट घेतली. असीम मुनीर यांच्या विरोधात पीटीआयने निदर्शनं थांबवावी, यासाठी इम्रान खान यांनी पीटीआय च्या कार्यकर्त्यांना समजावण्याची विनंती करण्यात आली. तसेच सिंध प्रांतातील आंदोलने थांबवण्यास मदत करण्यास सांगितले आहे. २०१९ मध्ये पुलवामा हल्ला झाल्यानंतर तत्कालीन पंतप्रधान इम्रान खान यांनी आयएसआय चीफ असीम मुनीर यांना त्यांचा कार्यकाळ संपण्याआधीच पदावरून हटवले होते. आयएसआयच्या इतिहासात असे पहिल्यांदाच घडले होते. त्यामुळे असीम मुनीर आणि इम्रान खान यांच्यात खूप मोठे मतभेद निर्माण झाले होते. याच शत्रुत्त्वामुळे असीम मुनीर यांनी इम्रान खानला तुरुंगात पाठवण्याची योजना आखल्याचे मानले जाते. आता तेच असीम मुनीर इम्रान खान यांच्याकडे मदत मागत आहेत.

# नवापुरातील समस्या सोडविण्याबाबत उपोषण

## पालिकेच्या आश्वासनानंतर उपोषण मागे

**■ नवापूर । श.प्र.-**



शहरातील आंबेडकर पुतळयाजवळील समस्यांबाबत वारंवार प्रशासनाला सुचित करुनही कार्यवाही होत नसलयाने सामाजिक कार्यकर्ते उमेश पवार व भिम अनुयायींनी उपोषणाचा इशारा दिला होता. परंतू प्रशासनाने आश्वासन दिल्याने सदर उपोषण स्थगित करण्यात आले आहे.

स्थानिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरातील समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते उमेश पवार, भिमसेनिक भिमअनुयायी यांनी आक्रमक पवित्रा घेतला होता. प्रशासनाला वारंवार निवेदने देऊनही कोणतीही कार्यवाही न झाल्याने पवार यांनी महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाचे औचित्य साधून नवापूर तहसील कार्यालयाजवळ बेमुदत धरणे उपोषणाचा निर्धार केला होता.

यापूर्वीही या गंभीर समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी उमेश पवार यांनी एक दिवसीय लाक्षणिक उपोषण केले होते. मात्र, प्रशासनाकडून त्याची दखल न घेतल्याने परिस्थिती जैसे थे राहिली. यामुळे त्रस्त झालेल्या पवार यांनी अखेर बेमुदत उपोषणाचे शस्त्र उगारले.

काल सकाळी तहसील कार्यालयासमोर उमेश पवार उपोषणाला बसताच प्रशासनाची धावपळ झाली. अखेरीस, तहसीलदार दत्तात्रय जाधव, मुख्यधिकारी डॉ.मयुर पाटील, माजी नगराध्यक्ष गिरीश गावित, माजी नगरसेवक चंद्रकांत नगराळे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मध्यस्थीचा प्रयत्न केला. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरातील प्रलंबित समस्यांचे तातडीने आणि सकारात्मक दिशेने निराकरण करण्याचे ठोस आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले.

प्रशासनाकडून मिळालेल्या आश्वासनानंतर सामाजिक कार्यकर्ते उमेश पवार यांनी आपले नियोजित बेमुदत धरणे उपोषण तात्पुरते स्थगित केले आहे. मात्र, प्रशासनाने दिलेल्या वेळेत समस्यांची सोडवणूक न केल्यास पुन्हा आंदोलनाचा मार्ग अवलंबण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. आता प्रशासनाकडून या आश्वासनाची पूर्तता कधी होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. उपोषनास्थळी सामाजिक कार्यकर्ते उमेश पवार, कृणाल नरभवर, गोरख नगराळे, अजय चव्हाण, रोहन पवार, टेपन वसावे, संजय सोनवणे आदी उपस्थित होते.

### कल्याण

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| १०-०३-२०२५ १५-०३-२०२५ | ७८९-४९-५६८ | १२५-८९-४६९ | ३६९-८३-१५७ | १५६-२९-१८० | ● | १३०-४४-७८९ |
| १७-०३-२०२५ २२-०३-२०२५ | ५५८-८२-७७८ | २४४-०१-२९० | ५७९-१४-३४७ | १२०-३३-७८८ | १६०-७०-६७७ | ८८०-६६-२७७ |
| १७-०३-२०२५ २२-०३-२०२५ | १११-३३-१३९ | ६७७-००-३३४ | ४७०-१०-५५० | ८९०-७९-२८९ | २५७-३४-१५५ | २३४-९६-५५६ |
| ३१-०१-२०२५ ०५-०१-२०२५ | १२८-१२-३३६ | ४६०-०४-३५६ | ८८०-६६-३६७ | १७८-६१-५६० | १६९-६२-१३८ | २३५-०२-६७९ |
| ०७-०४-२०२५ १२-०४-२०२५ | १८०-९१-५८८ | २४७-३६-२६८ | ७८९-४४-२३९ | २७७-६३-६७० | ३४५-२३-२३८ | ४६९-९३-६८९ |
| १४-०४-२०२५ १९-०४-२०२५ | २५७-४०-३८९ | २७०-९६-२६८ | १६९-६२-५७० | ५५८-८०-२२६ | ४८९-१५-१६८ | ३५९-७६-२४० |
| २१-०४-२०२५ २६-०४-२०२५ | २४७-३५-५०० | ४६९-९१-३३५ | १४९-४४-२४८ | २९९-०८-४५९ | ४९०-३४-७८९ | २५७-४६-२६८ |
| २८-०४-२०२५ ०३-०५-२०२५ | ७८९-४३-२५६ | १२८-१४-१६७ | ३४५-२५-१६८ | १५०-६९-१८० | १३६-०५-१५९ | |

### मिलन डे

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १०-०३-२०२५ १५-०३-२०२५ | २३९-४४-२४८ | ६७८-१३-१४८ | ३४५-२९-१४४ | ७७०-४२-२५५ | ● | १४९-४७-२७८ | ● |
| १७-०३-२०२५ २२-०३-२०२५ | १२०-३६-११४ | ५७९-१२-५८९ | ३८८-९५-१७७ | १३८-२८-४७७ | ३५९-७९-१२६ | ५८८-१३-६७० | ● |
| १७-०३-२०२५ २२-०३-२०२५ | १३८-२८-२६० | ७८८-३७-२५० | ३४६-३८-१७० | १६०-७१-३८० | १४८-३४-३५६ | १४५-०३-६७० | ● |
| ३१-०१-२०२५ ०५-०१-२०२५ | ४५५-४५-१५९ | ६७०-३६-३६७ | २३६-१९-४६९ | ६८८-२६-४४८ | ८८९-५४-३५६ | १२०-३४-५९० | ● |
| ०७-०४-२०२५ १२-०४-२०२५ | ३६६-५१-२९० | २४७-३१-११९ | १५०-६१-४८९ | १४९-४०-४७९ | ४४६-४२-११० | १६९-६६-११४ | ● |
| १४-०४-२०२५ १९-०४-२०२५ | ६६७-९७-३७७ | १८०-९२-२४६ | ३४७-४४-१५८ | १५७-३८-४५९ | ४५०-९१-१३७ | ५५७-७२-५८९ | ● |
| २१-०४-२०२५ २६-०४-२०२५ | २००-२६-८९९ | ५९०-४१-२४५ | १२८-१७-२७८ | २३७-२०-५७८ | १३४-८५-२३० | २८९-९०-१३६ | ● |
| २८-०४-२०२५ ०३-०५-२०२५ | २३८-३३-३४६ | १७०-८६-२४० | ४४४-२५-१६८ | ३८९-०३-२३८ | १७९-७४-६९९ | | ● |

### मिलन नाईट

| सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|
| ४६७-७८-४५९ | ४५८-७८-४७७ | ३७९-९३-३४६ | ३४९-६९-३७९ | ● | ४९०-३१-१४६ |
| ४६७-७७-२६९ | ११३-५१-३८० | ५५८-८२-१५६ | ४४०-८९-२७० | ४५६-५५-४५६ | १२५-८५-१६८ |
| २९९-०२-३४५ | १९९-९०-३७० | ११२-४६-३४९ | १३८-२१-५६० | ३४५-२३-१३९ | ११६-८८-३५० |
| २४७-३७-१७९ | ६९०-५१-१३७ | ३३७-३३-२४७ | १२०-३७-४४९ | २००-२३-२४७ | २६०-८४-२३९ |
| २८०-०९-२३४ | ८८०-६५-६९० | ४५७-६१-३८० | १२९-२५-६९० | ८८०-६४-१५८ | ५९०-४५-१७७ |
| ३६९-८०-३३४ | ५६८-९३-१५७ | १६०-७६-२६८ | १७०-८७-१६० | २४४-०७-१६० | २४०-६२-५७० |
| १४५-०५-१६८ | २४६-२८-१८९ | ६८०-४४-१६७ | १५६-२७-१६० | २३५-०५-६९० | १२६-९४-१४९ |
| २३९-४५-१७७ | २८०-०५-७८० | १५८-४७-१३३ | १५९-५१-६७८ | | |

# दिनेश सिताराम पाटील



**भुसावळ । प्रतिनिधी ।** गोजोरा येथील रहिवासी दिनेश सिताराम पाटील (वय ४९) यांचे दि. २ रोजी संध्याकाळी ८ वाजता पुणे येथे दीर्घ आजाराने निधन झाले. ते सुचेत डेव्हलपर्स सुनील सिताराम पाटील यांचे लहान भाऊ होत. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी आई व दोन भाऊ असा परिवार आहे.

**नशिबाची परीक्षा**

शनिवार ०३/०५/२०२५

* मिलन डे *

१२६ ४५० ९०० **९-८** १७० १८९ ११६ | सिंगल ९-३-६

जोड ९२-१८-०३-६५-८७

* कल्याण बाजार *

१४० १५९ ५०० **५-६** १२३ २४० ६०० | सिंगल ५-७-९

जोड ५२-१६-३९-७४-६०

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे. कोणीही दुरुपयोग करु नये मो.९९७५४७९८२६

**गुरुवार ०१/०५/२०२५**
मेन बाजार -३८०-१३-२५६
मिलन ना.-१५९-५१-६७८

**शुक्रवार ०२/०५/२०२५**
मेन बाजार -
कल्याण-१३६-०५-१५९
मिलन डे -१७९-७४-६९९
मिलन ना.-

## क्लासिफाईड

**पाहिजेत**

हेअर कटींग सलुन दुकान कामासाठी ट्रेन/अनट्रेन कारागीर पगारी व कमिशन बेसीसवर पाहीजेत. न्हावी समाजाच्या गरिब व होतकरु मुलांना न्हावी या व्यवसायाचे प्रशिक्षण बेसीक पासुन ते प्रोफेशनल सलुन डिप्लोमापर्यन्त मोफत दिले जाईल. तसेच जळगाव व्यतिरिक्त बाहेर गावाच्या मुलांना राहण्याची व जेवनाची व्यवस्था मोफत आहे. फॅमिलीसह राहणाऱ्यांसाठी रुम उपलब्ध आहेत. संपर्क : ९४२३१८५१५६, ९५७९०७४२९९ (सीएम-३९६२५१ दि.२०/५/२५)

**खरेदी विक्री**

जळगाव शहर परिसरात व जिल्ह्यात, प्लॉट, शेत, फ्लॅट, दुकान, घर, बंगला इ. खरेदी विक्रीसाठी व भाड्याने देणे घेण्यासाठी विश्वासनीय ठिकाण स्वामीकृपा ईस्टेट ब्रोकर जळगाव. आमच्याकडे सुंदर लोकेशन व दर्जेदार क्वॉलिटीचे बांधकाम असलेले गच्चीताबा बंगलोज, स्वस्त भावाच्या, जिरायत, बागायत, रोडटच, एन.ए. झोन शेतजमिनी विकणे आहेत. संपर्क : ९४२३१८५१५६, ९५७९०७४२९९ (सीएम-३९६२५१ दि.२०/५/२५)

**दारुबंदीचा गुरुमंत्र**

द ग्रेट साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे ॲडमिट करा... ।। नका करु... पेशंटला सांगा....।। नका सांगू.... पेशंटला आणा.... ।। नका आणू.... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासुन १०० टक्के मुक्ती.... सर्व सुविधांनी परिपूर्ण:- * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इजंक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... ॲडमिट सुविधा... * (विशेष) गरिबांसाठी फीमध्ये सवलत... तर आजच संपर्क :- ९५५२६१९७५२. डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (६४६२/व्ही.एम./०९/०१/२६)(CRINV-2425JL/CRG00504)

**१००% व्यसनमुक्ती**

* गॅरंटीने सोडवा. दारु + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखु + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी.डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव मो.९५५२६१९७५२,www.drpalve nashamuk tikendra.in १००% रिझल्ट. (६४६३/व्ही. एम./०९/०१/२६) (CRINV-2425JL/CRG00503)

**उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी**

जुनाट सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे. जुनाट संधीवात / चिकून गुनिया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मुळव्याध, एचआयव्ही, भुक लागत नाही?, वजन कमी? थकवा जाणवतोय?, LOW CD4 COUNT? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा - अहमदनगरचे सुप्रसिध्द डॉक्टर पालवे, वरणगाव मो.नं. ९५५२६१९७५२ (६४६४/व्ही. एम./ ०९/०१/२६) (CRINV-2425JL/CRG00505)

**देशदूत**

धुळे आवृत्तीसाठी छोट्या जाहिरातील रु.५/- प्रतीशब्दाप्रमाणे स्वीकारल्या जातील. शब्दाची किमान मर्यादा १५ व कमाल मर्यादा ४०. सतत तीन दिवस दिल्यास चौथ्या, पाचव्या व सहाव्या दिवशी विनामूल्य. जाहिरातीच्या मजकूर दै. 'देशदूत'च्या छोट्या जाहिरातीच्या फॉर्मवर सुबक अक्षरात लिहून दै. 'देशदूत', 'देशदूत कार्यालय' राणी मेडीकल शेजारी, ग.नं. ६ ,धुळे ४२४००१. संपर्क धुळे-२३७९१४ फॅक्स २३८९१४.

**सूचना**

वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची 'देशदूत' वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल 'देशदूत' वृत्तपत्र समुहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.